aglasem.com

FOR KARNATAKA CLASS 10 PREPARATION

Karnataka SSLC Model Question Paper 2027 for Marathi First Language (Paper 2) Key Answers

EXAM	YEAR	TYPE	SUBJECT
Karnataka Class 10	2027	Answer Key	Marathi

ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು - 560 003

KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD,
MALLESHWARAM, BENGALURU - 560 003

SSLC MODEL QUESTION PAPER-2 2026-27

ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು
MODEL ANSWERS

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M** Code No. : **08-M**

ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

Subject : First Language — MARATHI

[ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 [**Max. Marks : 100**

प्रश्न क्र.	अचूक उत्तरे	गुण
I.	**पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.** **6x1=6**	
1	'सदाचार' या संधीचा विग्रह असा होतो. - (अ) सत् + आचार (ब) सदा + चार (क) सद + आचार (ड) सदे + आचार **उत्तर : (अ) सत् + आचार**	1
2	'मुले मैदानावर क्रिकेट खेळेत होते.' या वाक्यातील काळ ओळखा - (अ) भविष्यकाळ (ब) अपूर्ण भूतकाळ (क) पूर्ण भूतकाळ (ड) वर्तमानकाळ **उत्तर : (ब) अपूर्ण भूतकाळ**	1
3	'महासागर' हे या समासाचे उदाहरण आहे - (अ) बहुव्रीही समास (ब) अव्ययी समास (क) द्वंद्व समास (ड) कर्मधारय समास **उत्तर : (ड) कर्मधारय समास**	1
4	'गरज सरो.....' ही म्हण पूर्ण करा. (अ) बैल मरो (ब) सर्व मिळो (क) वैद्य मरो (ड) काम सरो **उत्तर : (क) वैद्य मरो**	1

5	'देव आहे असे मानणारा' या शब्दसमुहासाठी एक योग्य शब्द हा आहे- (अ) आस्तिक (ब) नास्तिक (क) पाक्षिक (ड) ध्येयवादी **उत्तर : (अ) आस्तिक**	1
6	'भारत माझा देश आहे.' या वाक्यातील 'भारत' या शब्दाची जात ही आहे - (अ) विशेषन (ब) क्रियापद (क) नाम (ड) सर्वनाम **उत्तर : (क) नाम**	1
II 7	**पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा. 4 x 1 = 4** सदाचार षष्ठी विभक्ती : चा, ची, चे : : सप्तमी विभक्ती : ..... **उत्तर : त, ई, आ**	1
8	आजीने गोष्ट सांगितली : कर्मणी प्रयोग : : मांजराने उंदाराला पकडले : ..... **उत्तर : भावे प्रयोग**	1
9	तनय : मुलगा : : वदन : ..... **उत्तर : तोंड, आनन, मुख इत्यादी.**	1
10	निंदा : स्तुती : : कृतज्ञ : ..... **उत्तर : कृतघ्न**	1
III	**खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. 7 x 1 = 7**	
11	बुधवारी काकूबाई कोठे गेल्या होत्या? **उत्तर : बुधवारी काकूबाई लेखकाच्या मुलांसाठी नाटकाचे फुकट तिकीट आणायला गेल्या होत्या.**	1
12	जपानमधील 'गृहिणी मंडळ' या संस्थेची स्थापना केव्हा झाली? **उत्तर : जपानमधील 'गृहिणी मंडळ' या संस्थेची स्थापना 1948 साली झाली.**	1
13	'पैल तो गे काऊ कोकताहे' या कवितेचे मूल्य काय ? **उत्तर : 'पैल तो गे काऊ कोकताहे' या कवितेचे मूल्य आर्तता, तळमळ हे आहे.**	1
14	काकूंनी कोणता निर्वाणीचा संदेश दिला ? **उत्तर : कुत्र्याला तरी घालवून द्यावे. अथवा कांकूना तरी कायमची रजा दयावी असा निर्वाणीचा संदेश दिला.**	1
15	कवी कोणाशी बोलत आहे? **उत्तर : कवी कावळ्याशी (काऊशी) बोलत आहे.**	1
16	देशभक्तांनी आपल्या जीवनात कशाला संक्षेप दिला ? **उत्तर : देशभक्तांनी आपल्या जीवनात स्वार्थहेतुला संक्षेप दिला.**	1

17	गाव कशांनी वेढलेले आहे? (सोपा) **उत्तर : गाव चार-दोन उदास झाडांनी वेढलेले आहे.**	1
IV 18	**खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. 3 x 2 = 6** **खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (साधारण)** अ) हेलपाटा होणे ब) अवसान जाणे **उत्तर : अ) हेलपाटा होणे - व्यर्थ ये-जा होणे. (1)** **ब) अवसान जाणे - हिंमत खचने. (1)** **(वाक्यप्रचारांचा वाक्यात उपयोग व्हावा, अर्थाचा नव्हे)** **(अर्थ सांगणे $\frac{1}{2}$ गुण, वाक्यात उपयोग $\frac{1}{2}$ गुण**	2
19	**अलंकार ओळखून लक्षणे लिहा. (साधारण)** **'झाडं म्हणजे आमची दोस्तमंडळीच.'** **उत्तर : रुपक अलंकार** लक्षणे : उपमेय आणि उपमान यात एकरुपता आहे; ते भिन्न नाहीत असे वर्णन जेथे असते तेथे रुपक अलंकार होतो.	2
20	**गण पाडून व्रत्त ओळखा. (साधारण)** **'मना सज्जना तू कडेनेच जावे'** **उत्तर :** म ना स | ज्ज ना तू | क डे ने | च जा वे U - - | U - - | U - - | U - - वृत्त : भुजंगप्रयात अक्षरसंख्या : 12 गण : य, य, य, य यती : 6 व्या अक्षरावर	2
V 21	**खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा. 7 x 2 = 14** **वाटणीच्या घोळाने गणातात्यांच्या घरात काय काय घडत होते ?** **उत्तर :** वाटणी करावी म्हणून घरात दररोज भांडण होत होते. कधी शेतातली कामे खोळंबून राहत होती तर कधी घरातील चुल बंद पडत होती. घरातील बायकामध्ये वाटणीच्या कारणाने धुसफुस वाढत होती. घरातील कटकटी वाढतच चालल्या होत्या.	2
22	**कोपऱ्यातील छत्री घेऊ नका असे दुकानदार लेखकाला का म्हणाला? (सोपा)** **उत्तर :** दुकानदाराने लेखकाला कमीत कमी किंमतीच्या चांगल्या छत्र्या दाखविल्या पण लेखकाने कोपऱ्यातील छत्री निवडली. पण ती छत्री फाटकी होती त्यामुळे पावसाचे सबंध पाणी अंगावर येईल त्यामुळे तुम्ही भिजाल, त्यासाठी ती छत्री तुम्ही घेऊ नका असे दुकानदार लेखकाला म्हणाला.	2

23	**"दिर्घोद्योग व कष्ट करण्यानेच यश प्राप्त होते." संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **संदर्भ :** प्रस्तुत संदर्भ 'विद्यार्थ्यांनो जागृत व्हा!' या पाठातील असून या पाठाचे लेखक डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आहेत. **स्पष्टीकरण :** कोणतेही ध्येय साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आणि अपार कष्ट करण्याची तयारी असणे आवश्यक आहे. कष्टातील सातत्य व निरंतर प्रयत्न याचे महत्व विद्यार्थ्यांना समजावुन सांगताना आंबेडकरांनी वरील उद्गार काढले आहेत. इंग्लंडमधील ज्या अभ्यासक्रमाला आठ वर्ष लागत होते, तो अभ्यासक्रम कष्टाच्या जोरावर त्यांनी दोन वर्ष तीन महिन्यात पूर्ण केला. हा दाखला देतात.	2
24	**केसोबास यांचा परिचय लिहा.** **उत्तर :** केसोबास ऊर्फ केशिराजबास (तेरावे शतक). महानुभाव पंथातील हे ज्येष्ठ ग्रंथकार व संस्कृत पंडित होते. नागदेवाचार्य यांचे पट्टशिष्य होते. नागदेवाचार्यांच्या सूचनेवरुन केसोबासांनी मराठीत ग्रंथरचना केली. पंथाचे तात्त्विक अधिष्ठान दृढ बनविण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. महानुभाव साहित्यात त्यांनी मोलाची भर घातली. 'श्री चक्रधरोक्त सूत्रपाठ', 'मूर्तिप्रकाश', 'दृष्टांतपाठ', 'गुढे' या त्यांच्या मराठीतील ग्रंथरचना प्रसिद्ध आहेत. तसेच 'रत्नमालास्तोत्र', 'ज्ञानकलानिधीस्तोत्र', 'दृष्टांतस्तोत्र' या संस्कृत रचना त्यांनी केलेल्या आहेत.	2
25	**पाहुणे कोठून आले आहेत कसे आई मुलाला सांगते?** **उत्तर :** 'पाहुणे कोठून आले आहेत?' असे बाळयाने आईला विचारले असता आई त्याला सांगते कावळे, गिधाडे, घारी जेथून येतात. डास, घुंगुरटी, डोंगळे जेथून येतात तसेच खोकला, ताप ही दुखणी जेथून येतात तेथूनच हे पाहुणे आम्हाला त्रास देण्यासाठी आली आहेत असे आई मुलाला सांगते.	2
26	"गाई पांगता जीवाची रागामुळं व्हई आग" संदर्भासह स्पष्टीकरण करा. **उत्तर : संदर्भ :** प्रस्तुत संदर्भ 'नेनंता गुराखी' या कवितेतील असून या कवितेचे कवी इंद्रजित भालेराव हे आहेत. **स्पष्टीकरण :** जेव्हा गाई माळरानावर इकडेतिकडे विखुरतात किंवा चरण्यासाठी पांगतात तेव्हा त्या गाई गुरांना एकत्र करताना त्या लहान गुराख्याची दमछाक होते, तो खुप बेजार होतो. आणि रागामुळे त्याच्या जीवाची आग होते.	2
27	**विंदा करंदीकर यांचा परिचय लिहा.** **उत्तर :** गोविंद विनायक करंदीकर (1918-2010) हे मराठीतील ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी आहेत. इंग्रजी विषयाचे प्राध्यापक होते. 'स्वेदगंगा', 'मृदगंध', 'ध्रुपद', 'जातक' हे त्यांचे प्रसिद्ध कवितासंग्रह आहेत. 'राणीचा बाग', 'एकदा काय झालं', 'परी गं परी', 'बागुलबुवा' हे त्यांचे बालकवितासंग्रह आहेत. त्यांच्या काव्यसंग्रहाचे गुजराती, इंग्रजी व हिंदी भाषेत अनुवाद झाले असून महाराष्ट्र शासनाचे दहा पुरस्कार, कबीर पुरस्कार, कोनार्क पुरस्कार अशा पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची डी.लिट. ही पदवी बहाल करण्यात आली. आपल्या बहुतेक पुरस्कारांची मिळालेली रक्कम त्यांनी समाजातील विविध संस्थांना वाटून टाकली.	2

VI	**खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा.** **1 x 3 = 3**	
28	अ) ग्रंथ हेच गुरु **किंवा** ब) जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी **उत्तर : कल्पनाविस्तार (उत्तराचे मुद्दे)** **i) कल्पनेचा अर्थ :** 1 **ii) उदाहरण व स्पष्टीकरण :** $1\frac{1}{2}$ **iii) तात्पर्य :** $\frac{1}{2}$	3
VII	**खालील प्रश्नांची पाच-सहा वाक्यात उत्तरे लिहा.** **10 x 3 = 30**	
29	**लढाईत जखमी लोकांसाठी व इतरांसाठी श्रीमंतांनी काय केले?** **उत्तर :** वसईचा किल्ला ताब्यात घेण्यासाठी झालेल्या लढाईत जे लोक जखमी झाले होते त्यांची विशेष काळजी चिमाजीअप्पांनी घेतली. त्यातील कित्येक लोकांना पालखीत बसण्याचा सन्मान दिला. अनेकांना गाव व जमिनी इनाम म्हणून दिल्या. त्याचबरोबर जे सैनिक लढाईत मृत्यू पावले होते त्यांच्या कुटुंबासाठी बैठा पगार दिला व जमिनीही दिल्या. अशा प्रकारे सगळ्यांच्या उदरनिर्वाहाची काळजी चिमाजीअप्पांनी घेतली.	3
30	**'कमीज खाँ' यांच्यासमवेत झालेल्या स्त्रियांच्या क्लब पार्टीचे वर्णन करा.** **उत्तर :** टोकियोमधल्या एका फॅशनेबल हॉटेलमध्ये ही पार्टी आयोजित करण्यात आली होती. काही प्रतिष्ठित पुरुष मंडळी या समारंभाला हजर होते. मध्यभागी पिंगपाँगसारखं खूप मोठं, लांबट टेबल ठेवले होते. दोन्ही कोपऱ्यात झगमगीत प्रकाशात मोठमोठे कॅमेरे स्टँडवर उभे केले होते. टेबलावर सर्व खाद्य पदार्थ व पेये कलापूर्ण पद्धतीने मांडली होती. मध्यभागी लाऊडस्पीकारही होता. हजर असलेल्या स्त्रियांमध्ये राजकन्या, प्रसिद्ध नटी, गायिका, कवयित्री, कादंबरीकार अशा स्त्रिया होत्या. राजकन्या इतक्या नम्र होत्या की त्यांचा दिमाख त्यांच्या वागण्या बोलण्यात अजिबात दिसला नाही. या सर्वांची तोंडओळख व्हावी म्हणून लेखिकेला तेथे बोलाविण्यात आलेले होते.	3
31	**टपरीपाशी उभ्या असलेल्या मुलाचे वर्णन डॉक्टरांनी कसे केले आहे?** **उत्तर :** डॉ.रवींद्र कोल्हे एका आदिवासी गावात गेले असताना त्यांना कोपऱ्यावरच्या पानाच्या टपरीपाशी एक तरुण पाठमोरा उभा असलेला दिसतो. जीनची पँट, पूर्ण बाह्यांचा शर्ट, डोळ्यावर गॉगल व हातात गुटक्याचे पाकिट होते. तो तरुण गुटका आ वासून तोंडात टाकताना त्याला समोर डॉक्टर दिसले. तेव्हा त्याने ते गुटक्याचे पाकिट खिशात टाकले व डॉक्टरांना नमस्कार केला. डॉक्टरांनी त्याला तब्येतीबद्दल विचारले. त्यावर तो काहीच उत्तर न देता केवळ हसला. यावरून तो काहीच करत नाही हे डॉक्टरांना समजले. असे अर्धवट शिक्षण सोडून रिकामी बसलेली पोरं डॉक्टरांना अधून मधून भेटत होती. अशाप्रकारे त्यांनी आदिवासी तरुण मुलाचे वर्णन केले आहे.	3

32	**सावित्रीबाई खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी कशा होत्या ते लिहा.** **उत्तर :** महात्मा फुले यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यात सावित्रीबाई फुले यांनी मोलाची साथ दिली. त्यांच्या खांद्याला खांदा लावून कार्य केले. त्यासाठी अनेक कष्ट सहन केले. महात्मा फुले यांच्या आग्रहाखातर सावित्रीबाई घरीच शिकल्या व शाळेत शिक्षिका म्हणून कार्य करू लागल्या. त्यावेळी समाजाने त्यांना प्रचंड त्रास दिला. सावित्रीबाईंनी तो त्रास सहन केला पण आपल्या शैक्षणिक कार्यापासून मागे हटल्या नाहीत. त्याचबरोबर आपल्या पतीच्या मृत्यूनंतर अंत्ययात्रेच्या वेळी टिटवं धरण्यावरुन उद्भवलेल्या प्रसंगाला सावित्रीबाई मोठ्या धीराने सामोरे गेल्या. स्वत: टिटवं हाती धरलं आणि आपण पतीच्या मृत्यूनंतरही त्यांच्यासोबत आहोत हे दाखवून दिले. महात्मा फुले यांच्या प्रत्येक कार्यात सावित्रीबाईंचे फार मोठे योगदान आहे म्हणून खऱ्या अर्थाने त्या सहधर्मचारिणी होत्या.	3
33	**'अण्णा वारल्यावर आईचे जगच खल्लास झाले होते' याचा अर्थ स्पष्ट करा.** **उत्तर :** 'तू मरत का नाहीस' असे दिवसातून अनेक वेळा आपल्या पतीला म्हणणारी अक्का खरोखरच जेव्हा तिचा पती मरण वारतो त्यावेळेस ती खूप शोकमग्न दिसत होती. अतिशय उद्विग्न स्थितीत ती वावरत होती. तिच्या काळजात आपल्या पतीविषयी अपार प्रेम व श्रद्धा दिसत होती. परिस्थितीने व्याकुळ झालेली अक्का जमिनीवर डोके आपटून आक्रोश करीत होती. 'वाघासारखा माझा नवरा गेला' अशा शब्दात ती आपल्या काळजात खोलवर रुतलेला व कधीही विस्मरणात न जाणारा आपला नवरा व्यक्त करायची. आपल्या पतीच्या निधनाने जणू तिचे जीवन उद्ध्वस्त झाले होते. तिचे जगणेच निरर्थक झाले होते.	3
34	**श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रुक्मिणीने कोणकोणते प्रयत्न केले ?** **उत्तर :** श्रीकृष्णाचे गुणाचे व रुपाचे वर्णन ऐकून रुक्मिनीने मनोमन श्रीकृष्णाला आपला पती मानले होते. श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रुक्मिणीने अनेक वृत्त केले, नियम धरले व देव, गुरु ब्राह्मणांची सतत मनोभावी पूजा केली. आपल्या दारी आलेल्या कोणत्याही याचकाला कधीही रिकाम्या हातानी परत पाठवले नाही. अशा प्रकारे प्रयत्न केले.	3
35	**'ही बार बार तलवार येईल का पुन्हा' या ओळीचा अर्थ स्पष्ट करा.** **उत्तर :** 'भला जन्म हा' या कवितेत शाहीर राम जोशी यांनी समाजात धर्माच्या नावाखाली जे ढोंगी साधू कर्मकांड करतात व लोकांना फसवतात अशा त्यांच्या ढोगींपणावर सडकून टिका केली आहे. 'तलवार' हा शब्द मानवी देहाला उद्देशून म्हटले आहे. मनुष्याला हा नरदेह, मनुष्य जन्म एकदाच लाभतो, तो दुर्मीळ आहे. तो सार्थकी लावण्यासाठी परमेश्वराला शरण जाऊन त्याची मनोभावे भक्ती करावी. आपल्या मनातील द्वेष, मत्सर काढून टाकून नरदेहाचे सार्थक केले पाहिजे. ढोंगीपणामुळे परमेश्वर प्रसन्न होणार नाही त्याची अंत:करणापासून भक्ती करावी असा सल्ला देतात.	3
36	**कवीने कृष्ण, कर्ण, मार्कंडेय यांचे दाखले का दिलेले आहेत?** **उत्तर :** 'गाऊ त्यांना आरती' या कवितेत कवी यशवंत यांनी सैनिक, संत, देशभक्त व समाजसुधारक यांचे गुणगान करताना कृष्ण, कर्ण व मार्कंडेय यांचे दाखले दिलेले आहेत.	3

	कारण जसे कुरुक्षेत्रावर युद्ध करावे का नाही अशा गोंधळलेल्या अवस्थेत असलेल्या अर्जुनाला **कृष्णाने** योग्य मार्गदर्शन केले व युद्धास प्रवृत्त केले. अर्जुनाला आपल्या कर्माची आठवण करून दिली. त्याप्रमाणे संतदेखील समाजातील गोंधळलेल्या लोकांना योग्य मार्गदर्शन करतात. म्हणून कृष्णाचा दाखला दिला आहे. कुरुक्षेत्रावर **कर्ण** हा रथहीन व शस्त्रहीन झाला असतानादेखील रणांगणातून माघार न घेता अशा कठीण परिस्थितीतही धैर्याने लढला व आपल्या राज्यासाठी प्राणांची आहुती दिली. तसेच सैनिकदेखील आपल्या राष्ट्राच्या रक्षणासाठी शत्रुशी लढतात व आत्मबलिदान देतात म्हणून कर्णाचा दाखला दिला आहे. **मार्कंडेय** ऋषी अल्पायुष्य असतानादेखील शंकराची उपासना करून ते दीर्घायु बनले तसे देशभक्त देशसेवा करून अमरत्व प्राप्त करतात. म्हणून कवितेत मार्कंडेयाचा दाखला दिला आहे.	
37	**पृथ्वी सूर्याची याचना कशी करत आहे ? तिची सद्याची अवस्था कशी आहे ?** **उत्तर :** पृथ्वी सूर्याकडे खुप आर्ततेने प्रेमाची याचना करत आहे. युगामागुन अनेक युगे निघून गेली तरी सूर्य तिची फसवणूक करत आहे. त्याच्या प्रेमासाठी ती अनंत काळापासून त्याच्या कक्षेमध्ये फिरत आहे. कितीदा प्रितीची याचना करावी ? असा सतंप्त सवाल करते. सद्या तिची आवस्था खुप हताश झाली आहे. तिच्या तारुण्यातील बहर ओसरला आहे. तिच्या अंगातील पूर्वीचा उत्साह, स्फूर्ती, जोश संपला आहे. तिच्या मनात निराशारुपी काळोख उरला आहे. अशी तिची आवस्था आहे.	3
38	**'धरण' कवितेत स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे?** **उत्तर :** 'धरण' कवितेत कवी दया पवार यांनी कष्ट करूनही उपाशी राहणाऱ्या ग्रामीण भागातील स्त्रियांच्या वेदना मांडल्या आहेत. ग्रामीण भागातील स्त्रियांना भल्या पहाटे उठून दळण-कांडण, स्वयंपाकपाणी करावे लागते. तिच्याकडे धान्य कमी असल्यामुळे कणी कोंड्याचा स्वयंपाक करावा लागतो. यातून तिची गरीब परिस्थिती दिसून येते. तान्हे लेकरू वेताच्या बुट्टीखाली झोपवून तिला भर उन्हात धरण बांधण्याचे काम करावे लागते. उन्हाचे चटके पायाला बसू नयेत म्हणून तिच्याकडे चपला देखील नाहीत. त्यामुळे ती पायाला झाडाचा पाला बांधून काम करते. धरणातील पाण्याचा उपयोग करून शेतकरी, उद्योगपती सर्वांचे जीवन सुधारले मात्र कष्ट करून देखील या स्त्रियांना पिण्याच्या घोटभर पाण्यासाठी वणवण फिरावे लागते. कष्ट करूनही त्यांच्या जीवनात सुखाचे क्षण लाभत नाहीत. नेहमी संघर्ष करावा लागतो. या सर्वांतून तिची गरीब परिस्थिती दिसून येते.	3
VIII	**खालील प्रश्नांची आठ-दहा वाक्यात उत्तरे लिहा.** **4 x 4 = 16**	
39	**लेखकाने चाफा व बांबू या झाडांबद्दल कोणती माहिती सांगीतली आहे? ते सविस्तर लिहा.** **उत्तर :** लेखक गुलजार यांना झाडे खूप प्रिय आहेत. **चाफा** या झाडाची कुठलीही फांदी किंवा पान तोडले की, दुधासारखा पांढरा चीक निघतो म्हणून त्याला लेखक 'बडी माँ' असे म्हणतात. या झाडाची गंमत म्हणजे फुलं आले की, पानं गायब होतात आणि पान येतात तेव्हा फुलांचा पत्ता नसतो. तो पाना-फुलांचा लपंडाव पाहताना खुप मजा वाटते की, बडी	4

	माँ च्या अंगाखांद्यावर त्या पानाफुलाचं बागडणं चालू आहे. **बांबु**च्या वनातला वारा 'सोंय सोंय' असा शीळ घालतो. जणू काही तो 'साई साई' असे देवाचे नाव घेत आहे असे लेखकाला वाटते. ही बांबूची झाडं खुप वर्ष बांबू देतात. जेव्हा बांबुच्या वनाचा नाश व्हायची वेळ येते तेव्हाच बांबूला फुले येतात हे त्याचे वैशिष्ट्य लेखक सांगतात. **किंवा** **'हिरवे सांगाती' या शीर्षकाची यथार्थता स्पष्ट करा. (साधारण)** **उत्तर :** 'हिरवे सांगाती' या पाठात लेखक गुलजार यांनी पिंपळ, जांभूळ, पपई, चाफा, गुलमोहर या झाडांची वैशिष्ट्ये व त्यांच्याविषयी आठवणी सांगितलेल्या आहेत. सुरुवातीला या पृथ्वीतलावर वनस्पतीच्या रुपाने पहिला जीव जन्माला आला. त्यानंतर हळूहळू उत्क्रांती होत मानवाची निर्मिती झाली. यावरून झाडांशी आपले फार पूर्वीपासून आपले कौटुंबिक नाते असल्याचे लेखक पटवून सांगतात. झाडे ही अधिक चैतन्यशील असतात. झाडांच्या संगतीत माणूस अधिक खुलतो. झाडे, वनराई, शेती, हिरवळ यामुळे माणसाला अधिक समाधान व शांती मिळते. झाडे सावली, फळे, फुले देतात. विविध प्रकारे माणसाला उपयोग पडतात. संकटाच्या काळी उभारी देतात. म्हणून झाडांशी आपले कौटुंबिक स्नेहाचे नाते जडले आहे. हिरवा रंग निसर्ग, ताजेपणा, समृद्धी आणि नवचैतन्य यांचे प्रतीक मानला जातो. तर 'सांगाती' म्हणजे सोबत चालणारे, साथ देणारे जीवन प्रवासातील सहचर. त्यामुळे 'हिरवे सांगाती' शीर्षकातून झाडे ही मानवाच्या जीवनप्रवासातील आधार देणारे सोबती आहेत असा अर्थ सूचित होतो. म्हणून 'हिरवे सांगाती' हे शीर्षक पाठात आलेल्या आशयाची अधिक अर्थपूर्ण, सूचक, सुसंगत व यथार्थ आहे.	
40	**धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयातील वातावरण कसे होते? ते सविस्तर लिहा.** **उत्तर :** धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयात गंगूबाई वयाच्या सातव्या वर्षी दाखल झाल्या. गंगूबाईंनी येथेच देशप्रेमाचे धडे गिरविले. द.रा. बेंद्रे हे शाळेचे मुख्याध्यापक होते. ते स्वत: उत्तम कवी आणि संगीताचे जाणकार असल्यामुळे लहानपणी बेंद्रे मास्तरांची शाबासकी आणि प्रेमाचे थाप पाठीवर पडली म्हणजे गंगूबाईंना प्रोत्साहित झाल्यासारखे वाटत असे. राष्ट्रीय विद्यालयात अनेक मोठे साहित्यिक आणि राजकारणी येत असत. येथेच गंगूबाईंनी लोकमान्य टिळकांना पाहिले. राष्ट्रीय विद्यालयातील 'वंदे मातरम्' आणि भारतमातेचे वर्णन असलेली प्रार्थना ही गंगूबाईंना खूप आवडत असायची. ही प्रार्थना त्या अतिशय आवडीने मनापासून गात असत. शाळेचे वातावरण देशप्रेमाने ओथंबलेले होते. येथेच गंगूबाईंच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली. अशाप्रकारे राष्ट्रीय विद्यालयातील वातावरण शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध होते.	4

	किंवा **गंगूबाईंच्या गळ्यावर शस्त्रक्रिया का करण्यात आली? त्याचा काय परिणाम झाला? (साधारण)** **उत्तर :** गंगूबाईंचा आवाज अतिशय पातळ, नाजूक आणि बारीक होता. त्यामुळे त्या गाऊ लागल्यानंतर त्यांचा घसा दुखू लागे. पण त्यांनी गाणे थांबविले नाही. शेवटी डॉक्टरांनी टॉन्सिल्सचे ऑपरेशन करण्यास सांगितले. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांच्या गळ्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. पण त्याचा असा परिणाम झाला की, त्यांचा आवाज संपूर्णपणे बदलून गेला होता. तो पुरुषी झाला होता. पण गंगूबाई खचल्या नाहीत. ही दैवी देणगी आहे असे समजून जिद्दीने त्या रियाज करीत राहिल्या व आपली संगीत साधना पूर्ववत चालू ठेवली.	
41	**'या भारतात बंधुभाव' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा. (कठीण)** **उत्तर :** 'या भारतात बंधुभाव' या कवितेत संत तुकडोजी महाराजांनी भारतात एकता नांदावी, बंधुभाव रहावा अशा प्रकारचा आशीर्वाद परमेश्वराकडे मागितला आहे. देशातील सर्व पंथ, संप्रदाय यांच्यात मतभेद असू नयेत, त्यांच्यात एकता असावी, गरीब-श्रीमंत एका विचाराने रहावेत, सर्व लोक गुण्यागोविंदाने रहावेत, हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख या सर्व धर्मांतील लोकांत सामंजस्य असावे, सर्वांना स्वातंत्र्याचे सुख लाभावे. प्रत्येकाच्या मनात मानवता, राष्ट्रभावना रुजावी. सामुदायिक प्रार्थना व्हाव्यात, देशातील तरूण उद्योगी व शीलवान असला पाहिजे. अशा प्रकारचा आशीर्वाद परमेश्वराकडे ते मागतात. देशातील जातीयता, अस्पृश्यता मुळापासून नष्ट व्हावी, खलनिंदकाच्या मनातही सत्याची, न्यायाची भावना निर्माण व्हावी. प्रत्येक घरा-घरात स्वर्गीय आनंद नांदावा, देशातील संकटे नष्ट व्हावीत, देशात भयमुक्त वातावरण असावे, समाजात शांतता रहावी अशा प्रकारे एका समृद्ध अशा समाजाची अपेक्षा कवीने केली आहे. यातून त्यांची राष्ट्रभक्ती व जनकल्याणाची तळमळ दिसून येते.	4
42	**खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.** **उत्तर :** कवच भूमिचे आणि अचानक भेदुनि आले हिरवे कौतुक नचिकेताचे स्वप्न अथवा अविचत हो साकार पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार मातीची ही मात मृत्युवर. **किंवा** कोसळली सर दक्षिण उत्तर घमघमले मातीतुनि अत्तर. अष्ट दिशांतुन अभीष्टचिंतन, घुमला जयजयकार पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार	4

IX 43	**खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.** **1 x 4 = 4 (2+2)** स्वप्ने ती नसतात जे आपण झोपेत पाहतो, स्वप्ने ती असतात जी आपल्याला झोपू देत नाहीत. प्रत्येक विद्यार्थ्यांने आपल्या आयुष्यात एक मोठे ध्येय निश्चित केले पाहिजे. परंतु केवळ मोठी स्वप्ने पाहुन चालत नाही, तर ती स्वप्ने सत्यात उतरवण्यासाठी अथांग कष्टांची आणि सातत्याची जोड द्यावी लागते. अपयश ही यशाची पहिली पायरी आहे, असे आपण म्हणतो; पण अपयशाने खचून न जाता, त्यातून धडा घेऊन पुन्हा उभे राहणे यातच खरे कौशल्य आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ घोकंपट्टी करुन मिळवलेले गुण तुम्हाला तात्पुरते यश देऊ शकतील, परंतु व्यावहारिक जीवनात यशस्वी होण्यासाठी तुमच्याकडे नाविन्यपूर्ण विचार आणि कल्पकता असणे आवश्यक आहे. समस्यांवर मात करण्याचे धाडस ज्या विद्यार्थ्यामध्ये असते, तोच भविष्यात देशाचा नेता किंवा शास्त्रज्ञ बनतो. तुमच्याकडे असलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील शेवटच्या घटकाचे जीवन सुंदर करण्यासाठी करा, हाच तुमच्या शिक्षणाचा खरा सन्मान असेल. **प्रश्न : अ) लेखकाच्या मते 'खरी स्वप्ने' कशी पूर्ण होतात ?** **(02)** **उत्तर :** लेखकाच्या मते केवळ मोठी स्वप्ने पाहुन चालत नाही. तर ती स्वप्ने सत्यात उतरविण्यासाठी अथांग कष्टाची आणि सातत्याची जोड दयावी लागते. मोठे ध्येय निश्चित करुन ते ध्येय गाठण्यासाठी सातत्यपूर्ण कठोर परिश्रम घ्यावे लागते. अपयशाने खचून न जाता त्यातुन धडा घेऊन जिद्दीने पुढे जाणे आवश्यक आसते. **ब) व्यावहारिक जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्याकडे कोणकोणते गुण असणे आवश्यक आहे?** **उत्तर :** व्यवहारीक जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्याकडे नाविन्यपूर्ण विचार करण्याची क्षमता असणे आवशय्क आहे. तसेच कोणत्याही समस्येवर मात करण्याचे धाडस असावे लागते. त्याच बरोबर कल्पकता, चिकाटी, कठोर परिश्रम, नैतिकमूल्य, या गोष्टी असणे आवश्यक आहे. (02)	4
X 44	**खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा.** **1 x 5 =5** राज्यस्तरीय भाषण स्पर्धेत तुमच्या मित्राचा/ मैत्रिणीचा प्रथम क्रमांक आला आहे. त्याबद्दल पत्राद्वारे त्याचे/तिचे अभिनंदन करा. किंवा तुमच्या भागातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासंदर्भात ग्रामपंचायत किंवा महापालिकेच्या अधिकाऱ्यांना तक्रार अर्ज लिहा.	

	उत्तर : पत्र : i) प्रेषक पत्ता (पाठविणाऱ्याचा पत्ता व दिनांक) 1 ii) मायना 1 iii) विषय मांडणी व भाषा सजावट 2 iv) समारोप व स्वाक्षरी $\frac{1}{2}$ v) कोणाला पत्र पाठवावयाचे त्याचा पत्ता $\frac{1}{2}$ **किंवा** **अर्ज :** i) प्रेषक पत्ता (अर्ज लिहीणाऱ्याचा पत्ता व दिनांक) 1 ii) मायना (अधिकाऱ्याचा हुद्दा) 1 iii) विषय $\frac{1}{2}$ iv) मजकूर 2 v) सही व पत्ता $\frac{1}{2}$	5
XI 45	**खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा.** **1 x 5 = 5** **अ) अंधश्रद्धा एक शाप** **ब) झाडे नसती तर ...!** **उत्तर :** निबंध लेखनाचे मुद्दे : i) आकर्षक प्रारंभ 1 ii) विषयज्ञान 2 iii) भाषासौंदर्य 1 iv) शेवट 1	5